॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✲ सुविचार ✲**
कोणतेही स्वप्न जादूने सत्यात उतरत नाही, त्यासाठी घाम गाळावा लागतो, कठोर परिश्रम करावे लागतात.

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. १९ जुलै २०२६ | ■ वर्ष ७ वे ■ अंक ४४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# वांगचुक यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न

## वांगचुक यांना रुग्णालयात हलविले । जंतरमंतरवर पोलिस बळाचा वापर, आंदोलक आक्रमक

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**
राजधानी दिल्लीत जंतरमंतरच्या मैदानावर गेल्या २१ दिवसांपासून पर्यावरण अभ्यासक सोनम वांगचुक यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू असताना शनिवारी सकाळी त्यांना जबरदस्तीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी पोलिसांनी बळाचा वापर करून बेमुदत आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, असा दावा कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी केला. सध्या वांगचूक यांच्यावर उपचार सुरू आहेत. परंतु त्यांनी अन्न खाण्यास विरोध केला असून माझे हे आंदोलन सुरूच राहील, अशी ठाम भूमिका घेतली. केंद्राच्या या दडपशाहीला देशभरातून विरोध होत असून, कॉकरोच जनता पार्टीसह विविध पक्ष संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यामुळे देशभरात आंदोलन पेटण्याची चिन्हे आहेत.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी शांततेच्या मार्गाने हे आंदोलन सुरू होते. परंतु वांगचुक यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू होते. त्यांची प्रकृती खालावली होती. याचे निमित्त करून केंद्र सरकारने सुरक्षा बळाचा वापर करून सकाळी वांगचूक यांना सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. वांगचुक यांना उचलून नेताना आंदोलकांनी विरोध केला. त्यावेळी आंदोलकांना मारहाण, धक्काबुक्की करून वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेण्यात आले. या आंदोलनाची चर्चा आता देशभरात होत आहे.

या आंदोलनाला विविध पक्षांचे राजकीय नेते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, अनेक सिने अभिनेते, अभिनेत्रींनी वांगचूक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. तसेच विरोधी पक्षांनीही आंदोलन चिरडण्याच्या प्रकाराचा निषेध केला. दरम्यान, पोलिसांच्या कारवाईमुळे जंतरमंतरवर काही वेळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती. हा लढा आता आणखी तीव्र होईल, असा इशारा सीजेपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी दिला. आता आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राजीनामा हवा आहे, अशी मोठी मागणी त्यांनी केली. या २१ दिवसांच्या उपोषणात वांगचुक यांचे तब्बल ९ किलो वजन घटले असून, अंतर्गत अवयवांना गंभीर इजा होण्याचा धोका डॉक्टरांनी वर्तवला होता. या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी शनिवारी पहाटे वांगचुक यांना वैद्यकीय देखरेखीखाली रुग्णालयात हलवले. या कारवाईदरम्यान आंदोलनस्थळी मोठा गोंधळ उडाला आणि पोलिसांनी अभिजीत दिपके यांना ताब्यात घेतले.



### दिपकेंचे आमरण उपोषण

■ वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून हटवून रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर आंदोलनकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली. यावेळी 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके यांनी स्वत: आमरण उपोषण सुरू केले. आता २० जुलै रोजी मोर्चाही पूर्वनियोजनाप्रमाणे काढण्यात येणार आहे. वांगचुक यांना हटवून हे आंदोलन संपेल, असा सरकारचा समज असेल तर तो चुकीचा आहे. आंदोलन आणखी तीव्र होईल, असा इशारा त्यांनी दिला.

## SPOT NEWS

### भारताची अंतराळात ऐतिहासिक झेप!

**● नवी दिल्ली –** भारतीय अंतराळ संशोधनाच्या इतिहासात आजचा दिवस एका नव्या सुवर्णयुगाची सुरुवात करणारा ठरला आहे. भारताने आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून आपले पहिले खासगी कक्षीय रॉकेट 'विक्रम-१' यशस्वीरीत्या अंतराळात झेपावून इतिहास रचला आहे. हैदराबादस्थित आघाडीचे अंतराळ स्टार्टअप 'स्कायरूट एरोस्पेस' द्वारे विकसित केलेल्या या रॉकेटच्या पहिल्या मोहिमेला 'मिशन आगमन' असे नाव देण्यात आले आहे. या यशस्वी प्रक्षेपणामुळे आता भारताचा समावेश जगातील अशा मोजक्या देशांमध्ये झाला आहे, ज्यांच्याकडे खाजगी क्षेत्रात स्वत:चे रॉकेट प्रक्षेपित करण्याची क्षमता आहे. शनिवारी सकाळी ११:३० वाजता श्रीहरिकोटाच्या पहिल्या लॉन्च पॅडवरून या ७ मजली उंच रॉकेटने धगधगत्या आगीच्या ज्वाळांसह निळ्या आकाशात झेप घेतली. हे प्रक्षेपण केवळ एका खासगी कंपनीचे यश नाही, तर भारताच्या अंतराळ क्षेत्रातील एक मोठी वैचारिक क्रांती आहे. आतापर्यंत अंतराळ मोहिमा ही केवळ सरकारी यंत्रणा म्हणजेच 'इस्रो'ची मक्तेदारी मानली जात होती. मात्र, या प्रक्षेपणाने भारताने उद्योग-चलित अंतराळ युगात अधिकृतपणे प्रवेश केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मोहिमेचे कौतुक करताना याला भारताच्या अंतराळ प्रवासातील 'एक ऐतिहासिक नवीन सीमा' असे म्हटले आहे.

### आमिर खानला बिश्नोई गँगकडून धमकी

**● मुंबई –** बॉलिवूड अभिनेता आमिर खानला बिश्नोई गँगकडून कथित धमकी देण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या पोस्ट आणि ऑडिओमुळे मोठी खळबळ उडाली आहे. सलमान खाननंतर आता आमिर खानही बिश्नोई गँगच्या निशाण्यावर असल्याची चर्चा सुरू झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचा दावा करणाऱ्या आरजू बिश्नोई आणि टायसन बिश्नोई या नावांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून आमिर खानला उद्देशून धमकीची पोस्ट आणि एक ऑडिओ शेअर करण्यात आला आहे.

## विनयभंगप्रकरणी प्राध्यापकावरील बडतर्फीची कारवाई न्यायाधिकरणाकडून कायम

**● अकोले । वीरभूमी–**
येथील अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयातील एका प्राध्यापकाविरुद्धच्या विनयभंग प्रकरणात विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाने संस्थेच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. संबंधित प्राध्यापकाविरुद्ध संस्थेने केलेली बडतर्फी व शिस्तभंगाची कारवाई कायदेशीरदृष्ट्या योग्य असल्याचे न्यायाधिकरणाने स्पष्ट केले.

महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. यासीन गुलाबभाई सय्यद यांच्याविरुद्ध पदाचा गैरवापर करून विनयभंग केल्याची गंभीर तक्रार दाखल झाली होती. अंतर्गत चौकशी समितीच्या अहवालानंतर संस्थेने त्यांना तातडीने सेवेतून बडतर्फ केले होते. या निर्णयाविरोधात संबंधित प्राध्यापकाने विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणात याचिका दाखल करून बडतर्फीचा आदेश रद्द करण्याची मागणी केली होती.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे विचारात घेत न्यायाधिकरणाने संबंधित प्राध्यापकाची याचिका फेटाळून लावली. संस्थेची कारवाई योग्य ठरवत संबंधित प्राध्यापकाला मुदतपूर्व निवृत्त करण्याचे आदेश दिले. तसेच त्यांच्या गंभीर गैरवर्तणुकीची दखल घेत पूर्ण निवृत्तीवेतनाऐवजी केवळ ७५ टक्के निवृत्तीवेतन मंजूर करण्याचे निर्देशही न्यायाधिकरणाने दिले.

या निर्णयाचे संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले. महाविद्यालयीन परिसर, विशेषतः विद्यार्थिनी आणि महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण राखणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. गैरवर्तणूक करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला संस्थेत स्थान नाही, हा संदेश या निकालातून स्पष्ट झाला आहे, अशी संयुक्त प्रतिक्रिया संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर आणि सचिव सुधाकर देशमुख यांनी दिली.

## ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन

**● पुणे । वीरभूमी–**
महाराष्ट्राच्या पुरोगामी, समाजवादी आणि लोकशाहीवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते, युवक क्रांती दल (युक्रांद)चे संस्थापक, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष आणि माजी आमदार डॉ. कुमार सप्तर्षी यांचे रविवारी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने राज्यातील सामाजिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्रात शोककळा पसरली असून पुरोगामी चळवळीतील एका महत्त्वाच्या पर्वाचा अंत झाल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त केली जात आहे.

मधुमेहाच्या त्रासामुळे काही दिवसांपासून त्यांची प्रकृती अस्थिर होती. अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समजताच विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, गांधीवादी विचारवंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दुःख व्यक्त केले.

डॉ. कुमार सप्तर्षी यांचा मुलगा कबीर सप्तर्षी इंग्लंडहून पुण्यात आल्यानंतर सोमवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत कोथरूड येथील गांधी भवन येथे सर्वसामान्य नागरिक, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांना अंत्यदर्शन घेता येणार आहे. त्यानंतर शासकीय आणि सामाजिक सन्मानाने त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जाणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.

डॉ. कुमार सप्तर्षी हे विद्यार्थी अवस्थेपासूनच सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय होते. अन्याय, विषमता, भ्रष्टाचार आणि सामाजिक अन्यायाविरोधात त्यांनी सातत्याने आवाज उठवला.

# एसआयआर मोहिमेत प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय सहभाग घ्यावा

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । अहिल्यानगर शहर मतदारसंघात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेचा आढावा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
केवळ निवडणुकीपुरती नव्हे, तर राष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही मतदार यादीची विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येक कार्यकर्त्याने या मोहिमेत योगदान द्यावे, असे आवाहन जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

अहिल्यानगर शहर मतदारसंघात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेचा आढावा मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाढे, उपमहापौर धनंजय जाधव, प्रांताधिकारी सुधीर पाटील तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना मंत्री विखे पाटील म्हणाले, काही प्रभागांमध्ये मतदार मॅपिंगचे काम चांगल्या पद्धतीने झाले असले, तरी काही ठिकाणी हलगर्जीपणा दिसून येत आहे. त्यामुळे अधिक समन्वयाने काम करण्याची गरज आहे.

एसआयआर मोहिमेला मुदतवाढ मिळाल्याने उर्वरित कालावधीत अधिक प्रभावीपणे काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. बीएलओंनी घरोघरी जाऊन पडताळणी करणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी तसे होत नसल्याची बाब त्यांनी प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. दुबार नोंदणी, मृत व्यक्तींची नावे व अन्य त्रुटी दूर करण्यासाठी पक्षाचे प्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणेने समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

पश्चिम बंगालचे उदाहरण देत विखे पाटील म्हणाले, एसआयआर मोहिमेमुळे तेथील बेकायदा मतदारांची नोंद ओळखण्यास मदत झाली. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अचूक मतदार यादी हा महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, अनेक वर्षे जुन्या मतदार याद्यांच्या आधारे निवडणुका झाल्या. मात्र, शहरी व ग्रामीण भागातील स्थलांतरामुळे अनेक मतदारांची नावे अद्याप जुन्याच ठिकाणी कायम आहेत. त्यामुळे मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी सर्वांनी जागरूकपणे काम करावे. काही धार्मिक स्थळांमधून मतदार मॅपिंगचे काम होत असल्याची गंभीर तक्रारही त्यांनी केली. कार्यकर्त्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी केले.




> मतदार मॅपिंगसह सर्व प्रक्रिया शासकीय कार्यालयात किंवा गावातील शाळांमध्ये बसून करण्याची जबाबदारी बीएलओंची आहे. मात्र, कोणत्याही धार्मिक स्थळातून हे काम सुरू असल्याचे आढळल्यास ती अत्यंत गंभीर बाब आहे. कार्यकर्त्यांनी केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेऊन चौकशी करण्याचे निर्देश प्रांताधिकारी सुधीर पाटील यांना दिले आहेत.
>
> **– ना. राधाकृष्ण विखे पाटील**

# SPOT NEWS

## डॉ. सप्तर्षींच्या निधनान सामाजिक चळवळीची मोठी हानी : ना. विखे

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार, ज्येष्ठ समाजवादी नेते, गांधीवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. आपल्या संपूर्ण राजकीय आणि सामाजिक वाटचालीत त्यांनी समाजातील सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवला. ग्रामीण जीवनाशी त्यांची असलेली नाळ त्यांच्या विचारांत आणि कृतीत कायम दिसून आली. शेतकरी, युवक आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच परखड आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील आणि डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यातील मैत्री, परस्पर सन्मान आणि जिव्हाळ्याचे ऋणानुबंध अखेरपर्यंत कायम राहिले. त्यांच्या निधनाने सामाजिक आणि वैचारिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. डॉ. कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

## क्रांती दिनी उपवर्गीकरणाविरोधात बौद्ध समाजाचा एल्गार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरण, संविधानविरोधी धोरणे आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत होणाऱ्या अपमानास्पद वक्तव्यांच्या निषेधार्थ ९ ऑगस्ट क्रांती दिनी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अवमान करणाऱ्या आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना जशास तसे उत्तर दिले जाईल. तसेच संविधान बचाव, सामाजिक ऐक्य आणि अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाच्या धोरणाविरोधात हा मोर्चा काढण्यात येणार आहे. यावेळी न्यायालयीन बंदर समितीचा अहवाल मुख्यमंत्री यांनी तातडीने सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली. अनुसूचित जातींतील ५९ जातींमध्ये फूट पाडण्याचे कटकारस्थान भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित घटकांकडून उपवर्गीकरणाच्या माध्यमातून रचले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. आरक्षणातील १३ टक्के हक्क कमी करण्याचा आणि संविधानात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा यावेळी करण्यात आला.पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा मोर्चा कोणत्याही समाजाविरोधात नसून मनुवादी विचारसरणी आणि सरकारच्या धोरणांविरोधात आहे. मातंग समाज हा आमचा बंधूच आहे. आमचा संघर्ष समाजात फूट पाडणाऱ्या प्रवृत्तींविरोधात असून कोणत्याही समाजाविरोधात नाही, असेही त्यांनी नमूद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवारातील एखाद्या सदस्याला मोर्चासाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. मोर्चाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावात बौद्ध युवकांचे गट तयार करण्यात येणार आहे.

# लोकसहभागातून प्रभाग दोनमधील उकिरडे हटविले

### स्वच्छता मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद । कचरा न टाकण्याची सामूहिक शपथ

**● शेवगाव । वीरभूमी –**

स्वच्छ भारत अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने शेवगाव शहरातील प्रभाग क्रमांक २ मध्ये नगरसेवक नितीन दहिवाळकर यांच्या पुढाकारातून लोकसहभागावर आधारित अभिनव स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने अनेक दिवसांपासून सार्वजनिक ठिकाणी साचलेले उकिरडे हटविण्यात आले. तसेच ते कायमस्वरूपी बंद ठेवण्याचा निर्धारही परिसरातील नागरिकांनी व्यक्त केला.

या मोहिमेत सचिन लॉन्ड्री परिसर, उचल फाउंडेशन, देशपांडे वाडा तसेच भारदे गल्ली येथील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता पूर्ण झाल्यानंतर संबंधित ठिकाणी यापुढे कचरा टाकला जाणार नाही आणि इतरांनाही कचरा टाकू दिला जाणार नाही, अशी सामूहिक शपथ नागरिकांनी घेतली. घरगुती कचरा केवळ नगरपरिषदेच्या घंटागाडीतच देण्याचा निर्धार करण्यात आला.



■ छाया । अमोल कराळे

स्वच्छ करण्यात आलेल्या जागेवर मुंजोबा देवाची स्थापना करण्यात आली. अनंत कुलकर्णी यांच्या हस्ते विधिवत पूजन करून परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करण्यात आला. परिसराची स्वच्छता ही केवळ नगरपरिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या उपक्रमामुळे परिसरातील अस्वच्छतेच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय होण्यास मदत होणार असून नागरिकांना स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी स्थानिक नागरिकांनी नगरसेवक नितीन दहिवाळकर तसेच शेवगाव नगरपरिषदेच्या प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले.

> स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. लोकसहभागाशिवाय स्वच्छ भारत अभियान यशस्वी होऊ शकत नाही. प्रभागातील उकिरडे कायमचे हटवून त्या ठिकाणी पुन्हा कचरा साचणार नाही, यासाठी नागरिकांनी घेतलेला निर्धार हीच या मोहिमेची खरी ताकद आहे. प्रभाग स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील.
>
> **– नितीन दहिवाळकर,** नगरसेवक, शेवगाव

## अगस्ती विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी दत्ता नवले

### विविध समित्यांवर नव्या पदाधिकाऱ्यांची निवडी

**● अकोले । वीरभूमी –**

अगस्ती विद्यालय, अकोले येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षपदी दत्ता नवले यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे पालक, शिक्षक आणि स्थानिक नागरिकांकडून स्वागत होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि विकासात्मक क्षेत्रात सक्रिय असलेल्या दत्ता नवले यांच्या अनुभवाचा विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास अगस्ती विद्यालय परिवाराने व्यक्त केला आहे.

शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच पालक आणि शाळेतील समन्वय अधिक दृढ करण्यासाठी दत्ता नवले प्रभावी योगदान देतील, अशी अपेक्षा मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी व्यक्त केली.

याचबरोबर शाळा व्यवस्थापन समितीवर दौलत कानवडे, भौतिक सुविधा समितीवर अमोल आभाळे, महिला तक्रार निवारण समितीवर पुनम वाकचौरे आणि सखी सावित्री समितीवर पुष्पलता जोर्वेकर यांचीही निवड करण्यात आली.या निवडीबद्दल अगस्ती एज्युकेशन सोसायटीच्या सचिव शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, मुख्याध्यापक संजय शिंदे, उपमुख्याध्यापक दौंड सर, पर्यवेक्षिका नंदा गोपाळे तसेच विविध सामाजिक संस्था, शिक्षणप्रेमी आणि मित्रपरिवाराने शुभेच्छा दिल्या असून, नव्या पदाधिकाऱ्यांना आगामी कार्यकाळासाठी यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

## भावकीच्या जुन्या वादातून खुनाच्या प्रयत्नातील चार मुख्य आरोपी पैठणमधून जेरबंद

### श्रीगोंदा पोलिसांची धडक कारवाई । न्यायालयाकडून सात दिवसांची पोलीस कोठडी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील गणपती मळा, सुपेकर वस्ती येथे भावकीतील जुन्या राजकीय वादातून एका व्यक्तीवर प्राणघातक हल्ला करून दोन्ही हात मनगटापासून तोडल्याच्या खळबळजनक प्रकरणातील चार मुख्य आरोपींना श्रीगोंदा पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथून अटक केली आहे. न्यायालयाने आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



■ छाया । विजय उंडे

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास गणपती मळा, सुपेकर वस्ती (ता. श्रीगोंदा) येथे रोहिदास हरिश्चंद्र दांगडे यांच्यावर घातक शस्त्रांनी हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात त्यांच्या दोन्ही हातांचा मनगटापासून छेद करण्यात आला होता. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६७८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ सहित विविध कलमांनुसार सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी परशुराम सुभाष दांगडे, अभयराज संजय दांगडे, सागर सुनील दांगडे, आणि तुषार बबन दांगडे (सर्व रा. घुगलवडगाव, ता. श्रीगोंदा) हे फरार होते. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी त्यांचा माग काढून पैठण (जि. छत्रपती संभाजीनगर) येथून शिताफीने अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे आणि पोलीस नाईक गणेश गाडे करीत आहेत. ही कारवाई श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोनि. संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि. गणेश अहिरे, पोलीस उपनिरीक्षक पवन मोहिते तसेच श्रीगोंदा पोलीस ठाणे आणि दक्षिण मोबाईल सेलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

# ग्लोबल स्पर्धेत टिकण्यासाठी स्वतःला घडवा

### अतिरिक्त पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे । संजीवनी विद्यापीठात नवगतांचे स्वागत

**● कोपरगाव । वीरभूमी–**

'तुमची स्पर्धा केवळ तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांशी नाही तर जगभरातील विद्यार्थ्यांशी आहे. त्यामुळे शिस्त, कौशल्य आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या बळावर स्वतःला घडवा. चांगल्या करीअरचा संकल्प करा. करीअर असे करा की आपण तेथे सर्वाच्च असु. चांगले करीअर घडविण्यासाठी परीस्थिती कधीही आडवी येत नाही, मात्र जिध्द हवी', असे प्रतिपादन अतिरिक्त पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले.

संजीवनी युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलाजीच्या प्रथम वर्ष नवगतांच्या स्वागत समारंभासाठी आयोजित 'संजीवनी संकल्प २के२६' कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजीवनी युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे होते.

श्री वाघचौरे यांनी विध्यार्थ्यांना सांगितले की, शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्यासाठी नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याचे माध्यम आहे. बाबा आमटे, विराट कोहली, एम. एफ. हुसेन, जॉर्ज बर्नार्ड शॉ आणि वॉरेन बफेट यांची उदाहरणे देत ते म्हणाले, आयुष्यात कोणतेही क्षेत्र निवडा, पण त्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळविण्याची जिद्द ठेवा. प्रत्येक विद्यार्थी बुद्धिमान असतोय मात्र त्या बुद्धिमत्तेला शिस्त आणि मेहनतीची जोड मिळाल्यास यश निश्चित मिळते. मी बैलगाडीतून प्रवास करणारा विद्यार्थी होतो, मात्र आज लाल दिव्याच्या गाडीत आलो. त्यामुळे स्वप्नांवर विश्वास ठेवून सातत्याने मेहनत केली, तर कोणतेही ध्येय गाठता येते.

सायबर सुरक्षेच्या विषयावर बोलताना श्री वाघचौरे यांनी मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करण्याचा सल्ला दिला. मोबाईल हे उपयुक्त साधन असले, तरी त्याच्या माध्यमातून अनेक सायबर गुन्हे आणि फसवणुकीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सतर्क राहून विवेकाने तंत्रज्ञानाचा वापर करावा. कोणत्याही व्यसनांच्या आहारी जाऊ नका आणि आई-वडिलांची स्वप्ने पूर्ण करा, असे ते म्हणाले.

यावेळी अमित कोल्हे यांनी एआयचा वापर करा पण त्यावर अवलंबून राहू नका. तंत्रज्ञान आपण नियंत्रित केले पाहिजे, तंत्रज्ञानाने आपल्याला नाही, असा सल्ला उपस्थित विध्यार्थ्यांना दिला. डिग्री तुम्हाला जॉब मिळविण्यासाठी पात्र बनवतेय पण स्किल्स तुम्हाला रोजगारक्षम बनवतात, तुमचा जॉब आणि तुमचं भविष्य सुरक्षित करतात. संजीवनीमध्ये इंडस्ट्री पॉवर्ड करिक्युलम, आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप, परकीय भाषा प्रशिक्षण आणि करिअरकेंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून विध्यार्थ्यांना जागतिक संधींसाठी तयार केले जाते. या संधींचा पुरेपूर लाभ घ्या.




■ छाया । जनार्दन जगताप

या प्रसंगी व्हाइस चान्सलर डॉ. ए. जी. ठाकूर, रजिस्ट्रार प्रा. अमोल ढाकणे, डीन डॉ. कविथा राणी, डॉ. प्रिया आर, डॉ. विनोद मालकर, डॉ. सरिता पवार, डॉ. मकरंद कुलकर्णी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यार्थिनी धनश्री देवकर आणि स्वस्तिका जगताप यांनी केले. आभार रजिस्ट्रार प्रा. अमोल ढाकणे यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## वारीच्या भक्तिमय वातावरणात नेत्रदान- अवयवदानाचा जागर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आषाढी वारीत भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माला समाजप्रबोधनाची जोड देत शहरात अवयवदान चळवळीबद्दल जागृती करण्यात आली. नेत्रदान व अवयवदानासाठी सातत्याने जनजागृती करणाऱ्या फिनिक्स सोशल फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाच्या अवयवदान समुपदेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहरातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमाला वारकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अवयवदानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. शहरातील प्रमुख मार्गांवरून जाणाऱ्या दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांच्या हातात नेत्रदान व अवयवदानाचे महत्त्व सांगणारे जनजागृतीपर फलक व बॅनर देण्यात आले होते. अवयवदान हेच श्रेष्ठ दान, नेत्रदानाने अंधांच्या जीवनात प्रकाश फुलवा, मरणोत्तर अवयवदानातून अनेकांना नवे जीवन मिळू शकते अशा संदेशांद्वारे नागरिकांना अवयवदानासाठी प्रेरित करण्यात आले. दिंडी मार्गावरील नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अवयवदानाविषयी माहिती जाणून घेतली. अनेकांनी अवयवदानाबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. धार्मिक आणि सामाजिक संदेशाची सांगड घालत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे समाजात अवयवदानाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. या जनजागृती मोहिमेत फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे तसेच अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाचे अवयवदान समुपदेशक सतीश आहिरे यांनी वारकऱ्यांसोबत सहभाग नोंदवत नागरिकांना अवयवदानाचे महत्त्व समजावून सांगितले.

## लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी यशवंत थोरात महाराजांचा जामीन नामंजूर

**● पारनेर । वीरभूमी–**

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या ढवळपुरी येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी यशवंत थोरात महाराज याला मोठा धक्का बसला असून, जिल्हा व सत्र न्यायालय (पॉक्सो विशेष न्यायालय), अहिल्यानगर यांनी त्याचा जामीन अर्ज फेटाळला आहे. फिर्यादीनुसार, पीडित मुलगी इयत्ता आठवीत शिकत असतानाच आरोपीने तिच्यावर प्रथम लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर अनेक वर्षे विविध प्रकारे तिचे लैंगिक शोषण करण्यात आले. तसेच अत्याचारादरम्यान पीडितेला पक्कडीने चटके दिल्याचाही गंभीर आरोप फिर्यादीत नमूद करण्यात आले आहेत. या प्रकरणात आरोपीला अटक झाल्यानंतर त्याने ९ जून २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १४ जुलै २०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश (पॉक्सो विशेष न्यायालय) एम. एच. शेख यांच्या समोर युक्तिवाद झाला. सुनावणीदरम्यान आरोपीच्या वकिलांनी अटक प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा दावा करत जामीन मंजूर करण्याची मागणी केली. मात्र पीडितेच्या वतीने ॲड. हृषीकेश शिंदे यांनी जोरदार विरोध करत आरोपीविरुद्ध यापूर्वी याच आरोपीवर वावी पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंद असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. अशा प्रकारच्या गंभीर आरोपांनंतरही आरोपीला कायद्याची भीती उरलेली नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. यावेळी सरकारी पक्षाच्या वतीने ॲड. एम. पी. केळगंद्रे यांनी दोषारोपपत्रासोबत जोडलेल्या वैद्यकीय अहवालातील पीडितेच्या शरीरावरील जखमा व बर्न इन्ज्युरींची माहिती न्यायालयासमोर मांडली.

# सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखान्याच्या मिल रोलरची पुजा

### या हंगामात सात लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्टे । आ. विवेक कोल्हे, ज्ञानेश्वर परजणे यांच्या हस्ते पुजन


■ छाया । जनार्दन जगताप

**● कोपरगाव । वीरभूमी–**

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या २०२६–२७ हंगामाच्या मिल रोलरची पुजा चेअरमन आमदार विवेकभैय्या कोल्हे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे यांच्या हस्ते शनिवारी संपन्न झाली. प्रारंभी प्रभारी कार्यकारी संचालक तुळशीराम कानवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करून संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली चालु वर्षी कारखान्यांने सात लाख मे. टन गाळपाचे उददीष्ट ठेवले असल्याचे सांगितले.

आमदार विवेकभैय्या कोल्हे याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, सहकारी साखर कारखानदारीत सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखान्यांने आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर करत देशात सर्वप्रथम बायो सीएनजी व पोटॅश ग्रॅन्युएल खत, उसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्माती प्रकल्प सुरू करत सभासद शेतकऱ्यांच्या उस उत्पादन वाढीसाठी थेट बांधावर धडक मोहिमेची अंमलबजावणी सुरू केली आहे. गेल्यावर्षी कारखान्यांने बॉयलर, बॉयलिंग हाउस सह प्रतिदिन गाळपात आधुनिकीकरण करत आवश्यक तेथे मशिनरीमध्ये सुधारणाही केल्या आहेत तेंव्हा कामगार बांधवासह अधिकारी, खाते प्रमुख, उप खातेप्रमुख आदि घटकांनी चालु वर्षी ठेवलेले गाळपाचे उददीष्ट पुर्ण करण्यासाठी सर्वतोपरी योगदान द्यावे. देश विदेशातील ज्ञान आत्मसात करून माजीमंत्री स्व. शंकररावजी कोल्हे यांनी सहकारी साखर कारखानदारीत केलेल्या कामातुन प्रेरणा घेत आपण मार्गाक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहे. कृत्रिम बुध्दीमत्ता एआयचा वापर करून सभासद शेतकऱ्यांसह साखर कारखानदारीवर अवलंबुन असलेल्या सर्वच घटकांची प्रगती आपल्याला साधायची आहे असेही ते म्हणाले.

सीओओ शिवाकुमार, तांत्रीक सल्लागार सीमांचल पांडा, मुख्य अभियंता महंतेश तोडकर, उपमुख्य रसायनतज्ञ हरेराम गोंड यांचा कारखान्याच्यावतीने सत्कार करण्यांत आला.

याप्रसंगी संचालक सर्वश्री. विश्वासराव महाले, त्रंबकराव सरोदे, रमेश घोडेराव, बाळासाहेब वक्ते, निलेश देवकर, ज्ञानदेव औताडे, बापूसाहेब बारहाते, विलासराव माळी, बापूराव औताडे, साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे, कामगार नेते मनोहर शिंदे, संभाजीराव बोरनारे, सर्व खाते प्रमुख, उपखातेप्रमुख, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते. शेवटी संचालक बाळासाहेब वक्ते यांनी आभार मानले.

## वसुंधरा अकॅडमीत स्वसंरक्षण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**● अकोले । वीरभूमी –**

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अकॅडमी, अकोले येथे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, धैर्य, शिस्त आणि वैयक्तिक सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने स्वसंरक्षण कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध स्वसंरक्षण तंत्रांचा प्रत्यक्ष सराव केला.

कार्यशाळेचे प्रमुख प्रशिक्षक विवेक लहानू शेटे यांचा उपप्राचार्या राधिका नवले यांच्या हस्ते स्वागत व सत्कार करण्यात आला.

मार्गदर्शन करताना विवेक शेटे यांनी आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचे संरक्षण कसे करावे, संकटसमयी शांत राहून योग्य निर्णय कसा घ्यावा, अनोळखी व्यक्तींशी वावरताना कोणती खबरदारी घ्यावी तसेच आत्मविश्वासाने कोणत्याही प्रसंगाला कसे सामोरे जावे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विविध स्वसंरक्षण तंत्रांचे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष सरावही करून घेतला.

या कार्यशाळेत इयत्ता पाचवी ते नववीच्या सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेत स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, धैर्य आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

या उपक्रमाचे संस्थापक अध्यक्ष मधुकर नवले, कोषाध्यक्ष तथा प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सचिन विक्रम नवले, सहसचिव अल्फोन्सा डी., उपप्राचार्या राधिका नवले, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी कौतुक केले.

कार्यशाळेचे नियोजन व संयोजन क्रीडा शिक्षक पंकज धुमाळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रज्ञा डुबे यांनी केले, तर अण्णासाहेब केदार यांनी आभार मानले.

## तिरुमला उडप्पी रेस्टॉरंटला डॉ. प्रशांत भालेराव यांची सदिच्छा भेट

### दर्जेदार सेवा, स्वच्छता आणि गुणवत्तेला प्राधान्य देत व्यवसाय वृद्धीचा दिला संदेश

**● शेवगाव । वीरभूमी–**

रेणुकामाता मल्टिस्टेट अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेडचे प्रमुख डॉ. प्रशांत (नाना) भालेराव यांनी शेवगाव येथील आंबेडकर चौकातील तिरुमला उडप्पी रेस्टॉरंटला सदिच्छा भेट दिली. यावेळी रेस्टॉरंटचे संचालक व पदाधिकाऱ्यांनी त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.


**शेवगाव येथील तिरुमला उडप्पी रेस्टॉरंटला सदिच्छा भेट दिल्यानंतर रेणुकामाता मल्टिस्टेट अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेडचे प्रमुख डॉ. प्रशांत नाना भालेराव यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करताना संचालक अमोल कराळे व उपस्थित मान्यवर.**

यावेळी डॉ. भालेराव यांनी रेस्टॉरंटच्या कार्याची माहिती घेत व्यवसायाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्राहकांना दर्जेदार सेवा, स्वच्छता आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देत व्यवसायात सातत्याने प्रगती करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

प्रसंगी रेस्टॉरंटचे संचालक अमोल कराळे व सचिन सातपुते यांनी डॉ. भालेराव यांचा सत्कार केला. यावेळी एकनाथ कुसळकर, पत्रकार जनार्दन लांडे, पत्रकार विजय धनवडे, पत्रकार संदीप देहाडराय आदी उपस्थित होते.

आंबेडकर चौकातील तिरुमला उडप्पी रेस्टॉरंट येथे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## ज्ञानज्योती फाउंडेशनच्या पुढाकारातून ग्रामीण विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**● पाथर्डी । वीरभूमी –**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळकटी मिळावी या उद्देशाने ज्ञानज्योती फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने जाटदेवळे, शिंदेवाडी व आठरेवस्ती येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय दप्तर व शैक्षणिक साहित्य वाटपाचा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला.


■ छाया । अनिल खाटेर

या उपक्रमात विद्यार्थ्यांना दर्जेदार दप्तर व आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव उमटले असून, या उपक्रमामुळे त्यांच्या शिक्षणाला नवी उभारी मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख उपस्थितीत ज्ञानज्योती फाउंडेशनचे संस्थापक नरेंद्र उमाळे, उपाध्यक्ष अमर चव्हाण तसेच उमेश सोनवणे उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व, कठोर परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वास यांच्या बळावर जीवनात यश संपादन करण्याचा संदेश दिला.

याप्रसंगी केंद्रप्रमुख विठ्ठल शिंदे, भवर सर, शेळके सर, दहीफळे सर आणि गायकवाड सर यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

शाळेचे मुख्याध्यापक झगडे सर यांनी आपल्या मनोगतात ज्ञानज्योती फाउंडेशनने ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखून राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत असून त्यांच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, ग्रामस्थ, पालक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी ज्ञानज्योती फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत भविष्यातही अशाच उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.

# जिल्हा न्यायालय परिसरात नव्या पोस्ट ऑफिसचे उद्घाटन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भारतीय डाक विभागाच्या वतीने नागरिकांना अधिक सुलभ, जलद, आधुनिक व दर्जेदार टपाल तसेच वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा न्यायालय परिसर, अहिल्यानगर येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालय पोस्ट ऑफिसचे उद्घाटन सौ. प्रीती अग्रवाल, पोस्टमास्टर जनरल, पुणे क्षेत्रयांच्या हस्ते संपन्न झाले.



या उद्घाटन समारंभास मा. श्री. एस. बी. कचरे, प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर तसेच मा. डॉ. दिलीप टिपरसे, उपपोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय न्यायालयातील न्यायिक अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, बार असोसिएशनचे पदाधिकारी, अधिवक्ते, न्यायालयीन कर्मचारी, भारतीय डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर नव्याने सुरू करण्यात आलेल्या पोस्ट ऑफिसची पाहणी करण्यात आली. मान्यवरांनी पोस्ट ऑफिसमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक सुविधा, ग्राहकाभिमुख सेवा तसेच नागरिकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेचे कौतुक केले.

यावेळी मार्गदर्शन करताना पोस्टमास्टर जनरल सौ. प्रीती अग्रवाल यांनी भारतीय डाक विभाग हा देशातील सर्वात विश्वासार्ह सार्वजनिक सेवा पुरविणारा विभाग असून बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. जिल्हा न्यायालय परिसरात सुरू करण्यात आलेले हे पोस्ट ऑफिस न्यायव्यवस्थेशी संबंधित अधिकारी, कर्मचारी, अधिवक्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच भारतीय डाक विभागामार्फत उपलब्ध असलेल्या बचत बँक, आधार सेवा, स्पीड पोस्ट, पार्सल, नोंदणीकृत टपाल, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक आणि इतर वित्तीय सेवांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे आयोजन विकासजी पालवे, वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टरीत्या करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अहिल्यानगर विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, अधिवक्ते, प्रसारमाध्यम प्रतिनिधी आणि नागरिकांचे आभार मानण्यात आले. जिल्हा न्यायालय पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून नागरिकांना अधिक प्रभावी, विश्वासार्ह आणि सहज उपलब्ध टपाल व वित्तीय सेवा देण्याच्या भारतीय डाक विभागाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्यात आला.

# पुणतांबा येथील श्री मार्तंडेश्वर (मामाभाचे) मंदिर शिलालेख

## अठराव्या शतकातील धार्मिक इतिहासाचा मौल्यवान पुरावा आढळला । मंदिर स्थापनेची अधिकृत नोंद

■ विजय उंडे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** जिल्ह्यातील राहता तालुक्यातील श्रीक्षेत्र पुणतांबा हे गोदावरी तीरावरील प्राचीन धार्मिक क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. याच ठिकाणी असलेल्या श्री मार्तंडेश्वर (मामाभाचे) मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावरील गणेशपट्टीवर अठराव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण शिलालेख कोरलेला आहे. मंदिर स्थापनेची अधिकृत नोंद करणारा हा शिलालेख महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत मौल्यवान प्राथमिक ऐतिहासिक साधन मानला जातो.

हा शिलालेख सुमारे १ फूट ÷ १ फूट आकाराच्या दगडी शिळेवर कोरलेला असून अक्षरांची उंची सुमारे ३ सें.मी. आहे. लेख देवनागरी लिपीत, मराठी भाषेत असून एकूण नऊ ओळींचा आहे. शिलालेख आजही अत्यंत सुस्थितीत असून वातावरणाचा कोणताही प्रतिकूल परिणाम त्यावर झालेला दिसत नाही. लेखातील सर्व अक्षरे स्पष्ट आणि ठळक असल्यामुळे थोड्याशा प्रयत्नाने संपूर्ण लेख सहज वाचता येतो. काही ठिकाणी शब्दांची संक्षिप्त रूपे वापरण्यात आली असून लेखाच्या प्रारंभी आणि शेवटी उभे दंड कोरलेले आहेत.

शिलालेखाचे वाचन

१. खख श्री गणेशाय नमः
२. स्वस्ति श्री शके१६९३
३. खरनामा ब्दे उत्तरायणे वसंतो
४. रुत्तो वैशाख कृष्ण १३ रविवार रेव
५. ति तवा युग तद्दिने श्री गोदांतर स्ता
६. पित श्री मार्तंडेश्वर चरणी तत्पर
७. कोलाजी सुत संकरांत्मज पांडुर
८. ग पंत हगवे निरंतर क्षेत्र पु
९. ण्य स्तंभ ।। श्री रस्तु ।। श्री ।।

शिलालेखाचा अर्थ : या शिलालेखाची सुरुवात श्री गणेशाय नमः या मंगलाचरणाने करण्यात आली आहे. त्यानंतर शालिवाहन शक १६९३, खर नाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतू, वैशाख कृष्ण त्रयोदशी, रविवार, रेवती नक्षत्र म्हणजेच दि. २६ मे १७७१ (रविवार) या शुभमुहूर्तावर गोदावरी तीरावरील श्री मार्तंडेश्वराची स्थापना करण्यात आल्याची नोंद आहे.

ही स्थापना कोलाजी यांचा पुत्र व शंकर यांचा नातू पांडुरंगपंत हगवे यांनी श्री मार्तंडेश्वराच्या चरणी अखंड भक्तिभावाने केली असून, या धार्मिक कार्याच्या स्मरणार्थ त्यांनी पुण्यस्तंभ उभारल्याची माहिती लेखात नोंदविण्यात आली आहे. शेवटी श्री रस्तु या मंगलकामनेने लेखाची सांगता करण्यात आली आहे.

हा शिलालेख केवळ देवप्रतिष्ठेची नोंद नसून अठराव्या शतकातील महाराष्ट्रातील धार्मिक परंपरा, कालगणना, वंशपरंपरा आणि दातृत्व संस्कृती यांचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.

सर्वप्रथम, या लेखात शक, संवत्सर, ऋतू, तिथी, वार आणि नक्षत्र यांची अचूक नोंद असल्यामुळे मंदिर स्थापनेची निश्चित तारीख २६ मे १७७१ ठरविण्यास मदत होते. त्यामुळे हा शिलालेख कालमापनाच्या दृष्टीने अत्यंत विश्वासार्ह पुरावा ठरतो.

लेखातील श्री मार्तंडेश्वर चरणी तत्पर हा उल्लेख तत्कालीन समाजातील भक्तिभाव, देवावरील निष्ठा आणि धार्मिक समर्पण अधोरेखित करतो. धार्मिक कार्ये शुभ मुहूर्त व ज्योतिषशास्त्रीय संकल्पनांनुसार केली जात असल्याचेही यावरून स्पष्ट होते.

या शिलालेखाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यामधील वंशावळीची नोंद. शंकर – कोलाजी – पांडुरंगपंत हगवे अशा सलग तीन पिढ्यांचा उल्लेख या लेखात आढळतो. स्थानिक घराण्यांचा इतिहास, सामाजिक रचना


■ छाया । विजय उंडे

आणि धार्मिक कार्यातील योगदान समजून घेण्यासाठी अशा नोंदी अमूल्य ठरतात.

विशेष म्हणजे क्षेत्र पुण्य स्तंभ हा उल्लेख महाराष्ट्रातील पुण्यस्तंभ उभारण्याच्या परंपरेचा महत्त्वपूर्ण पुरावा आहे. मंदिर, तीर्थक्षेत्र किंवा धर्मोपयोगी वास्तूंच्या निर्मितीनंतर पुण्यस्मरणार्थ स्तंभ उभारण्याची प्रथा तत्कालीन समाजात प्रचलित होती. हा शिलालेख त्या परंपरेची साक्ष देतो.

गोदावरी तीरावरील श्री मार्तंडेश्वर देवस्थानाच्या इतिहासासाठीदेखील हा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा आहे. मंदिराची स्थापना नेमकी कधी झाली, ती कोणी केली आणि त्यामागील व्यक्तिमत्त्व कोणते होते, याची अधिकृत माहिती याच लेखातून उपलब्ध होते. त्यामुळे स्थानिक धार्मिक इतिहास आणि सांस्कृतिक वारसा समजून घेण्यासाठी हा शिलालेख अनन्यसाधारण महत्त्वाचा ठरतो.

एकंदरीत, श्री मार्तंडेश्वर स्थापनेची नोंद करणारा हा शिलालेख अठराव्या शतकातील महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा एक महत्त्वपूर्ण प्राथमिक स्रोत असून इतिहास संशोधकांसाठी तो अत्यंत मौल्यवान दस्तऐवज आहे.

या शिलालेखाचे संशोधन, माहिती, संकलन व वाचन पुणे येथील शिलालेख वाचक अनिल दुधाणे यांनी केले आहे तर त्यांना ऋतिक लाहोटी, संतोष चंदने व करण सोनी यांनी सहकार्य केले आहे.

# उद्योजक सोमनाथ वरखडेंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश; आ. दातेंच्या नेतृत्वात काम करणार

● **पारनेर । वीरभूमी–** पारनेर तालुक्यातील निघोज परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला मोठी चालना देणारी महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड नुकतीच घडली. समाजाभिमुख भूमिका, विकासाची स्पष्ट दृष्टी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत उद्योजक सोमनाथ वरखडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.


■ छाया । भगवान गायकवाड

यावेळी आमदार दाते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस हा सामान्य जनतेच्या विश्वासाचा, विकासाचा आणि कार्यकर्त्यांच्या सन्मानाचा पक्ष आहे. पक्षात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला समान संधी आणि सन्मान देत समाजहिताच्या कामांना प्राधान्य दिले जाते. निघोज परिसरासह संपूर्ण मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सर्वांनी एकदिलाने काम केले तर विकासाची गती आणखी वाढेल. नव्याने पक्षात सहभागी झालेल्या प्रत्येक सहकाऱ्याच्या विश्वासाला न्याय देणे हीच आमची जबाबदारी आहे.

उद्योजक सोमनाथ वरखडे यांनीही आपल्या भावना व्यक्त करत आमदार काशिनाथ दाते यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यावर विश्वास व्यक्त केला. समाजाच्या प्रगतीसाठी सकारात्मक राजकारणाची गरज असून त्या विचारातूनच आपण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषद माजी सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आर. एस. कापसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संदीपशेठ रोहोकले, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, बाळासाहेब लामखडे, विठ्ठल कवाद, आनंदराव वराळ, व्हा. चेअरमन हिरामण सोनवणे, रोहीदास लामखडे, महादू लामखडे यांच्यासह तालुक्यातील विविध गावांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजूरमध्ये चारचाकीसह बनावट व प्रतिबंधित दारूसह ६.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त

● **अकोले । वीरभूमी–** राजूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत पोलिसांनी बनावट व राज्यात विक्रीस प्रतिबंधित दारूसह चारचाकी वाहन असा एकूण ६ लाख ६४ हजार ३३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ व भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री सुमारे ११ वाजता सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना गुप्त बातमीदारामार्फत राजूर येथील वंजार गल्लीमध्ये एका चारचाकी वाहनातून दारूची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस कॉन्स्टेबल सचिन शिंदे, वाय. एन. जाधव, डी. डी. परते, एस. वाय. रत्नपारखी तसेच दोन शासकीय पंचांच्या उपस्थितीत छापा टाकण्यात आला.

वंजार गल्लीमध्ये एमएच-०३-एआर-०१९४ क्रमांकाची चारचाकी आढळून आली. चौकशीत हे वाहन सोनू दिलीप मुर्तडक (वय २८) याच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न झाले. वाहनाची पंचांसमक्ष झडती घेतली असता विविध कंपन्यांच्या दारूच्या बाटल्या आढळून आल्या.

या दारूची किंमत १ लाख ६४ हजार ३३५ रुपये असून, त्यातील काही दारू बनावट तर काही राज्यात विक्रीस प्रतिबंधित असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.

यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक सावखेडकर यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून दारू व वाहन जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या दारूच्या प्रत्येक प्रकारातील तीन बाटल्या नमुन्यासाठी घेण्यात आल्या असून, त्यापैकी एक बाटली रासायनिक तपासणीसाठी नाशिक येथील प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येणार आहे.

या प्रकरणी राजूर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिली.

# नागरी व मल्टीस्टेट पतसंस्थांच्या अधिक सुरक्षिततेसाठी कायद्यात सुधारणा करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । महाराष्ट्रातील नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांच्या शिष्टमंडळाने घेतली भेट

● **कोपरगाव । वीरभूमी–** राज्यातील नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक, सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा करण्यात येतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. महाराष्ट्रातील नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेत विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री यांनी सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी राज्य शासन सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ मुख्यमंत्री फडणवीस यांना भेटले. या शिष्टमंडळात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्यकारी अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे तसेच राज्य मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, अहिल्यानगर जिल्हा स्थैर्यनिधी संघाचे अध्यक्ष शिवाजीआप्पा कपाळे, मल्टीस्टेट फेडरेशनचे संचालक कडुभाऊ काळे, रवींद्र कानडे, जितेंद्र जैन, सुकुमार पाटील अँड. गडगे साहेब यांचा समावेश होता.

बैठकीदरम्यान नागरी सहकारी व मल्टीस्टेट पतसंस्थांसमोरील विविध अडचणी, विद्यमान कायद्यांतील त्रुटी, सभासद व ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेशीर सुधारणांबाबत चर्चा झाली. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य शासन या क्षेत्रातील आवश्यक सुधारणा करण्यासाठी कटिबद्ध असून, पतसंस्थांवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी योग्य त्या कायद्यांमध्ये बदल करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, केंद्र शासनाने गठित केलेल्या आणि माझ्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या सहकार कायदा बदल समितीवर काका कोयटे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सहकारी पतसंस्था चळवळीत काका कोयटे यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून, त्यांनी समितीसमोर मांडलेल्या सूचना आणि शिफारशींना योग्य तो सन्मान दिला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.


■ छाया । जनार्दन जगताप

राज्यातील मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांशी संबंधित विविध विषयांवर राज्य मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांनी मांडलेल्या सूचनाही सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री यांनी नमूद केले. या विषयांवर केंद्रीय सहकार व गृहमंत्री अमित शहा यांच्यासमवेत स्वतंत्र बैठक आयोजित करून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी एनसीयूआयच्या आगामी निवडणुकीसंदर्भातही भाष्य केले. केंद्रीय सहकार व गृहमंत्री अमित शहा यांनी आमदार संजय भेंडे यांना निवडून आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश दिले असल्याची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेमुळे राज्यातील नागरी सहकारी आणि मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, भविष्यात अधिक सक्षम, सुरक्षित आणि पारदर्शक सहकार व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जाणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.